# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### नवी मुंबई विमानतळ अधिसूचित प्रभाव क्षेत्रात (नैना) पळस्पे (ता.पनवेल,जि.रायगड) गावातील गावकऱ्यांनी शेतजमिनींवर केलेल्या बांधकामांना मालमत्ता पत्रक मिळण्याबाबत

**(१) १६ (१६-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विमानतळ अधिसूचित प्रभाव क्षेत्रात (नैना) दीड वर्षापूर्वी पळस्पे गावातील (ता.पनवेल, जि.रायगड) गावकऱ्यांनी शेतजमिनींवर केलेल्या बांधकामांना मालमत्ता पत्रक मिळावे याकरीता आमरण उपोषण केल्यामुळे सिडकोचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी सर्व्हेक्षण करुन मालमत्ता पत्रक देण्याच्या आश्वासनाची अद्याप पूर्तता केली नसल्यामुळे तेथील गावकऱ्यांनी बेलापूरमधील नैना कार्यालयावर मोर्चा काढत तात्काळ मालमत्ता पत्रक देण्याची मागणी केली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पळस्पे (ता.पनवेल,जि.रायगड) गावातील शेतकऱ्यांना तात्काळ मालमत्ता पत्रक देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नैना क्षेत्रात समाविष्ट असलेल्या मौजे पळस्पे गावाच्या गावठाणामधील मालमत्तापत्रके "महास्वामित्व योजनें"तर्गत करण्यात येणार आहेत. सर्व्हेला लोकांचा विरोध असल्याने कार्यवाही पूर्ण झालेली नाही. गावठाणाबाहेरील क्षेत्राचा समावेश नगररचना परियोजनांमध्ये असल्याने MRTP अंतर्गत मा.लवादाची कार्यवाही पूर्ण होऊन त्यास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर अंतिम भूखंडाची मालमत्तापत्रके देण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जव्हार (जि.पालघर) येथील गटशिक्षणाधिकारी यांच्याविरुध्द शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेसंदर्भात प्राप्त तक्रारीबाबत

**(२) ७८ (२४-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) येथील प्रभारी गटशिक्षण अधिकारी यांनी नियमबाह्य नियम डावलून समायोजन प्रक्रिया विभागून राबविली असून काही मर्जीतील शिक्षकांची प्रतिनियुक्ती केल्याची तक्रार जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाली असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले तक्रारीच्या अनुषंगाने जव्हार येथील मर्जीतील शिक्षकांना नियमबाहय प्रतिनियुक्ती देणाऱ्या संबंधित दोषी गटशिक्षण अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१८-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर यांच्या अधिपत्याखाली गठीत केलेल्या चौकशी समितीस श्री.पुंडलिक चौधरी, प्रभारी गट शिक्षणाधिकारी जव्हार तथा विस्तार अधिकारी(शिक्षण) हे दोषी आढळून आले होते. त्यामुळे जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक २२/०५/२०२५ रोजीच्या आदेशान्वये त्यांना खुलासा सादर करण्याची संधी देण्यात आली. तथापि, चौकशी समितीच्या अहवालानुसार श्री.चौधरी हे दोषी आढळून आल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा(शिस्त व अपिल) नियम, १९६४ चे नियम ४(२) नुसार त्यांची माहे जुलै २०२५ ची एक वेतनवाढ (पुढील वेतनवाढीवर परिणाम करणारी) कायम स्वरूपी थोपवून ठेवण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणालीची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत

**(३) १२१ (२४-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रशासकीय कामकाज हे लोकाभिमुख, गतिशील व पारदर्शक होण्याकरीता शासकीय कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणाली सुरू करण्यात आली असून जिल्हा परिषदांचे जवळपास सर्वच विभाग हे डॅशबोर्डवर आले आहेत मात्र अद्यापही काही कर्मचारी, विभागप्रमुख ई-ऑफिसचा वापर करण्याचे टाळत असल्याने नागरीकांच्या तक्रारींचा निपटारा होण्यासाठी अडचणी निर्माण होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय कामकाज दिनांक १ जानेवारी,२०२५ रोजी पासून ई-ऑफिस प्रणालीद्वारे करणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, राज्यात ई-ऑफिसचा वापर १०० टक्के करून प्रशासकीय कामकाज हे लोकाभिमुख, गतिशील व पारदर्शक करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच ई-ऑफिसचा वापर न करणाऱ्या अधिकारी- कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (११-०९-२०२५) :** (१), (२) व (३)

• सर्व प्रशासकीय विभागांनी दिनांक १ जानेवारी,२०२५ पासून सर्व कामकाज ई-ऑफिसप्रणालीद्वारे करणे आवश्यक आहे.

• शासन पत्र दिनांक ३१ डिसेंबर २०२४ अन्वये राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना दिनांक १ जानेवारी, २०२५ पासून शासकीय कामकाजात ई-ऑफिस प्रणालीचा वापर अनिवार्य करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार जिल्हा परिषदांमध्ये ई-ऑफिस प्रणालीचा अवलंब करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एम.एस.एम.ई. पार्क उभारण्याबाबत

**(४) ६४२ (२४-०४-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात तब्बल १०० एकर जागेवर एमएसएमई पार्क उभारण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, नांदेड जिल्ह्यात सदर “एमएसएमई पार्क” उभारण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०५-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत प्राधान्याने MSME पार्कसाठी नविन संपादन करणे प्रस्तावित आहे.

(२) व (३) म.औ.वि. महामंडळाचे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे मारतळा, कुंभारगाव व कापसी (बु.) ता.लोहा जि.नांदेड येथील ४६८.६९ हे. आर खाजगी व ११४.२० हे. आर सरकारी असे एकूण ५८२.८९ हे. आर क्षेत्रास मऔवि अधिनियम १९६१ चे कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करणेबाबत उच्चाधिकार समितीच्या १५७ व्या बैठकित प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर बैठकीत “उद्योगांची भविष्यातील मागणी व औद्योगिक क्षेत्राची सुसाध्यता या दृष्टीने तपासणी करुन प्रथम टप्यात सरकारी ११४.२० हे. आर क्षेत्रास मऔवि अधिनियम १९६१ अन्वये कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करण्यास उच्चाधिकार समितीने तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे.

तथापि, प्रस्तावित ११४.२० हे. आर सरकारी क्षेत्रापैकी गट नं.२२/१ मधील १३.८६ हे. आर सरकारी व सलगतेसाठी ८६.१४ हे. आर खाजगी असे एकूण १००.०० हे. आर क्षेत्र संपादनासाठी प्रस्तावित आहे. सदरहू खाजगी ८६.१४ हे. आर क्षेत्रास उच्चाधिकार समितीची मान्यता घेणे प्रस्तावित आहे.

प्रस्तावित मारतळा औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ता.लोहा जि.नांदेड येथे ४०.४६ हे. आर क्षेत्रावर एमएसएमई पार्क उभारणीचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण भागातील घरकुल योजनेच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

**(५) ६९५ (२४-०४-२०२५) श्री.हेमंत पाटील, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक २३०७५ ला दिनांक १ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब व गरजू लाभार्थ्यांना हक्काचा निवारा उपलब्ध व्हावा यासाठी राज्य शासनाकडून इंदिरा आवास योजना, शबरी आवास योजना, रमाई आवास योजना, प्रधान मंत्री आवास योजनेंतर्गत शहरी भागासाठी सव्वा दोन लाख रुपये व ग्रामीण भागासाठी १ लाख २० हजार इतके रुपये अनुदान देण्यात येत असून सदर योजनेच्या अनुदानात मोठी तफावत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम साहित्याच्या वाढत्या दरामुळे ग्रामीण भागातील घरकुलांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात घरकुल बांधणे शक्य होत नसल्याने सदर योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानात ३ लाखापर्यंत वाढ करण्यात यावी अशी मागणी वारंवार लाभार्थ्यांकडून व लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेलंगणा राज्याच्या घरकुल योजनेत दोन खोल्यांच्या बांधकाम परवानगी देण्यात येत असून त्यासाठी किमान रुपये ५ लाख इतके अनुदान दिले जाते हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास तेलंगणा राज्याच्या धर्तीवर राज्यातील घरकुल योजनेत दोन खोल्यांच्या बांधकाम करण्यास परवानगी देण्याबाबत तसेच अनुदानात ३ लाखाची वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१२-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदरहू केंद्रीय योजना असल्याने केंद्र शासनाच्या निकषानुसार राज्यात त्याची अंमलबजावणी केली जाते. दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ तसेच विविध राज्यपुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टांमधून मंजूर करण्यात येणाऱ्या घरकुल लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानात रुपये ५०,०००/- एवढी अतिरिक्त वाढ करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २६९ चौ. फूट घरकूल बांधकामाकरीता रुपये १.२० लक्ष अर्थसहाय्य अनुज्ञेय असून मनरेगा अंतर्गत ९० दिवस अकुशल मजूरी साधारणपणे रक्कम रुपये २८,०८०/-व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रुपये १२,०००/- व अतिरिक्त वाढ रुपये ५०,०००/- या अतिरिक्त रुपये ५०,०००/- रक्कमेपैकी रुपये ३५,०००/- अनुदान हे घरकुल बांधकामासाठी तर, रुपये १५,०००/- इतके अनुदान हे प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतून छतावर १ KW मर्यादेपर्यंत सौर ऊर्जा यंत्रणा उभारणी करीता केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाव्यतिरिक्त अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय आहे. जे लाभार्थी सौर ऊर्जा यंत्रणा उभारणी करणार नाहीत त्यांना सदरील रुपये १५,०००/- अनुदान देय असणार

नाही. असे एकूण रुपये २,१०,०८०/- अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.

तसेच महसूल व वन विभागाच्या शासन अधिसूचना दिनांक १७/११/२०१८ अनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता असलेल्या शासनाच्या कोणत्याही गृहनिर्माण योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या व्यक्तीस, तहसिलदारांची लेखी पूर्व परवानगी घेऊन, स्वतःच्या घराच्या बांधकामासाठी पाच ब्रासपेक्षा अधिक नाही एवढी वाळू काढण्यास परवानगी देण्याची तरतुद आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात ग्रामीण भागातील महाआवास अभियान योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(६) ८४८ (२४-०४-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमधून ग्रामीण भागातील लाभार्थींना घरकुलाचा लाभ दिला जातो परंतु अंमलबजावणी करीत असताना विविध त्रुटीमुळे घरकुलांचे बांधकाम अपूर्ण राहत असल्याने राज्यात १०० दिवसांची विशेष मोहिम राबविली जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरकुलांचा पहिला हप्ता (अनुदान) अदा केल्यापासून १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊनही अपूर्ण राहणाऱ्या घरकुलांची संख्या अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याच्या अंमलबजावणीकरीता महाआवास महाअभियांनामध्ये कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१८-०८-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यात अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याच्या दृष्टीने महाआवास अभियान कालावधीमध्ये पुढील उपक्रम राबविण्यात येत आहेत.

१. भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे.
२. घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे मंजूरी देणे.
३. मंजूर घरकुलांना हप्ते वेळेत वितरीत करणे.
४. मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे.
५. प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे.
६. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे.
७. बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे.
८. डेमो हाऊसचा प्रभावी वापर करणे.
९. शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) करणे.
१०. नावीण्यपूर्ण उपक्रम (Innovations/Best Practices) राबविणे.

या व्यतिरिक्त अभियान कालावधीमध्ये लाभार्थ्यांचा सातत्याने पाठपुरावा करणे, तसेच तालुका स्तरावर, व ग्रामपंचायत स्तरावर लाभार्थी मेळावे आयोजित करणे, कार्यशाळा, आढावा बैठक, क्षेत्रिय भेटी इ. कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिकेने 'मोफत दहनविधी' सेवा तातडीने कार्यान्वित करण्याबाबत

**(७) १००८ (१७-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेने सर्व प्रकारचे दहनविधी मोफत देण्याचे ठरविल्याने सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात 'मोफत दहनविधी सेवा' या लेखाशीर्ष अंतर्गत दोन कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात ठाणे महानगरपालिकेची मोफत अंत्यसंस्कार योजनेची आजमितिपर्यंत अंमलबजावणी झाली नसल्याने मृतांच्या नातेवाईकांना अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या लाकडांच्या करीता हजारो रुपयांची रक्कम खर्च करावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने ठाणे शहरात "मोफत दहनविधी" सेवा तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०८-२०२५) :** (१) खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
ठाणे महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्र.१५४/२०,दिनांक ३१/०७/२००७ अन्वये गॅस (PNG/CNG) दाहिनीवरील अंत्यसंस्कार मोफत करण्यात येतात.तथापि,नागरिक लाकडावरील अंत्यसंस्कार करण्यास इच्छुक असल्यास स्वखर्चाने अंत्यसंस्कार करतात. ठाणे महानगरपालिकेकडून लाकडे पुरविण्यात येत नाहीत.
(३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात महासभा ठराव क्र.१५४/२०,दिनांक ३१/०७/२००७ अन्वये मागील १८ वर्षापासून गॅस दाहिनीवरील मोफत दहनविधी सेवा उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गावांतील मंजूर विकास कामे करुन घेण्याकरिता ग्रामपंचायत ठराव वा ना-हरकत दाखल्याची अट रद्द करणेबाबत

**(८) १२५५ (२४-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गावामध्ये विविध लेखाशीर्ष अंतर्गत कामे मंजूर होत असून या मंजूर कामांसाठी ग्रामपंचायतीचा ठराव किंवा ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असते. परंतु काही गावांतील सरपंच ग्रामपंचायतीचा ठराव किंवा ना-हरकत पत्र जाणीवपूर्वक देत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये

वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावातील मंजूर विकास कामांसाठी ग्रामपंचायतच्या ठरावाची किंवा ना-हरकत प्रमाणपत्राच्या या अटींमुळे विकास कामांना अडथळा येत असून विकास कामे न झाल्यामुळे सदरहू निधी अखर्चित राहत असून सदरची अट काढून टाकावी यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गावातील मंजूर विकास कामांसाठी ग्रामपंचायतच्या ठरावाची किंवा ना-हरकत प्रमाणपत्राची अट काढून टाकून सुधारित शासन परिपत्रक काढणेबाबत विभागाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलांबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

ग्रामीण भागातील गावांच्या विकासाकरीता शासनाच्या विविध विभागांकडून त्यांच्या अखत्यारितील योजनांसाठी जिल्हा परिषद तसेच इतर यंत्रणांना ग्रामपंचायत हद्दीमध्ये कामे करण्यास निधी उपलब्ध करून दिला जातो. ग्रामपंचायत हद्दीमध्ये करण्यात येणारी विकासकामे याची देखभाल दुरूस्ती, तसेच सदर मालमत्तेची मालकी ग्रामपंचायतीची राहणे व जागेबाबत वाद उद्भवू नये यासाठी दाखले घेण्यात येतात. सदर दाखले घेऊन काम सुरू करणे आवश्यक आहे.

यामध्ये अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत अल्पसंख्यांक बहूल ग्रामपंचायतीमध्ये मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रम अंतर्गत शासन निर्णय दिनांक २२/०९/२०१५ अन्वये ग्रामपंचायतींनी सादर करावयाच्या कागदपत्रांबाबत सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. तसेच, नियोजन विभागाच्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या दिनांक १२ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयातील सूचनेनुसार आवश्यक कागदपत्रे ग्रामपंचायतीने सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामविकास विभागानेही स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रस्तावित कामे तातडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने त्या कामासाठी आवश्यके कागदपत्रे त्वरीत उपलब्ध करून देण्याच्या व त्याबाबतची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दिनांक ०८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत.

ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामे करण्यासाठी वरील दाखल्याची गरज असते. अंतिमत: स्थानिक पातळीवर विकास कामे करतांना स्थानिक स्वराज्य संस्थेला सोबत घेऊन जाणे आवश्यक असल्याने ग्रामपंचायतींना कागदपत्रे सादर करण्याची अट शिथील करणे योग्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इंद्रायणी नगर, (जि.पुणे) येथील सेक्टर तीन मध्ये कोट्यावधी रुपये खर्चून उभारलेल्या उद्यानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(९) १३४६ (१७-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इंद्रायणी नगर (जि.पुणे) येथील सेक्टर तीन मध्ये कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या उद्यानाच्या देखभाल दुरुस्तीकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने

स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्यानातील तळ्याभोवती संरक्षक भिंत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पुरेशी स्वच्छतागृहे, लहान मुलांची खेळणी आणि व्यायामाची साधने आणि इतर बाबींची असुविधा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या उद्यानात सर्व सोयी सुविधा देऊन नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इंद्रायणी नगर मोशी प्राधिकरण (जि.पुणे) येथील सेक्टर तीन येथील उद्यान तत्कालिन पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण यांचेमार्फत विकसित करण्यात आले असून महानगरपालिकेमार्फत दैनंदिन देखभाल केली जात आहे.
(२), (३) व (४) सद्य:स्थितीत उद्यानातील तळ्याभोवती सुरक्षिततेच्या दृष्टीने काटेरी झाडांचे हरित कुंपण (Green Fencing) आहे. उद्यानात पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची व्यवस्था आहे. तथापि, पिण्याच्या पाण्याची तोट्यांची संख्या वाढवून देण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वाढीव नवीन स्वच्छतागृह बांधण्याचे काम लवकरच सुरु करण्यात येत आहे. तसेच खेळणी व व्यायामाचे साहित्य बसविण्याच्या कामाची निविदा ही अंतिम टप्प्यात असून कार्यारंभ आदेश देऊन काम त्वरीत सुरु करण्यात येत आहे.

---

## पुणे महापालिकेत समाविष्ट २३ गावांसह वाघोलीतील मनपा सेवकांना पालिकेच्या नियमानुसार वाढीव वेतन मिळत नसल्याबाबत

**(१०) १३५१ (१७-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट २३ गावांसह वाघोलीतील (जि.पुणे) महानगरपालिका सेवकांना पालिकेच्या नियमानुसार वाढीव वेतन मिळत नसल्याने या परिसरातील कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर २३ गावांतील मनपा सेवकांनी महानगरपालिका आयुक्तांकडे लेखी निवेदन देऊन आपल्या मागण्या मांडल्या आहेत त्याची प्रशासन तात्काळ दखल घेणार आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०८-२०२५) :** (१) अशी बाब आढळून आलेली नाही.
(२) २३ गावांतील मनपा सेवकांनी उपस्थित केलेल्या वेतन निश्चितीबाबतचे निरसन करण्यासाठी वेतननिश्चिती बाबत तपासणी करणेकामी मुख्य लेखा व वित्त विभाग, मुख्य लेखा परिक्षण विभाग व आस्थापना विभागातील माहीतगार सेवकांची समिती गठीत करुन पुढील कार्यवाही करण्यात आली होती.

समितीने आपला अहवाल सादर केला आहे. सबब याबाबत प्रशासनाने तात्काळ दखल घेतलेली आहे.
(३) या विषयाबाबत एकूण ४४५ सेवकांपैकी ४०८ सेवकांना दिनांक ०१/११/२०२३ पासून वेतनश्रेणी लागू केलेल्या असून उर्वरित ३७ सेवकांना समितीच्या प्राथमिक अहवालानुसार अंतिम वेतन निश्चितीच्या अधिन राहून दिनांक ७/१०/२०२४ पासून प्रारंभिक वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील महात्मा फुले वाडा आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणाबाबत

**(११) १९८८ (१७-०४-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील महात्मा फुले वाडा आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादन आणि रहिवाशांचे अन्यत्र पुनर्वसन करण्यासाठी मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी (नगरविकास) प्रशासकीय मान्यता दिली असून या कामासाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर असून सदर निधी पुणे महानगरपालिकेकडे वर्ग केला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून पुणे महानगरपालिकेस निधी प्राप्त झाला असून महात्मा फुले वाडा व क्रांतीज्योती स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०८-२०२५) :** (१) खरे आहे.

तथापि, रुपये २०० कोटी पैकी रुपये १०० कोटी निधी पुणे महानगरपालिकेस वितरित करण्यात आला आहे.
(२) पुणे महानगरपालिकेने भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जा.क्र.LAM/६२, दिनांक ०८ एप्रिल २०२५ रोजी पाठविण्यात आला असून सद्य:स्थितीत पुणे महानगरपालिकेमार्फत संयुक्त मोजणी फी भरणेची प्रक्रिया चालू आहे.

महानगरपालिका स्तरावर तडजोडीने जागा ताब्यात घेण्याकरीता करावयाच्या कार्यवाहीसाठी महानगरपालिका आयुक्त यांच्या मान्यतेने आरक्षित क्षेत्रातील बाधित रहिवाशी यांचे सर्वेक्षणाचे काम करण्यात येत आहे. सदर सर्वेक्षणाद्वारे आरक्षित क्षेत्रातील बाधित रहिवाशी यांची मागणी विचारात घेऊन पुर्नवसन विकल्प तपासण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वैद्यकारी अधिकारी अद्याप नियुक्तीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(१२) २६५१ (१०-०७-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अलिबाग, सातारा, सिंधुदुर्ग, नंदुरबार, परभणी व धाराशिव या जिल्ह्यात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या वैद्यकीय महाविद्यालयांसाठी सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक,गट-अ संवर्गातून निवड करण्यात आलेले ४८ उमेदवार माहे डिसेंबर, २०२४ पासून नियुक्ती मिळण्याच्या प्रतीक्षेत असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून या उमेदवारांचे शिफारस पत्र वैद्यकीय शिक्षण विभागाकडे पाठवण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या अपुऱ्या मनुष्यबळावर वैद्यकीय महाविद्यालयांचे कामकाज सुरु असल्याने अनेक अडचणी येत असून याप्रकरणी शासनाने प्रलंबित असलेल्या उक्त नियुक्त्या करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-०९-२०२५) :** (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सहयोगी प्राध्यापक गट-अ संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील पदांचे मागणीपत्र सन २०२४ मध्ये सादर करण्यात आले होते.
आयोगाकडून शिफारस प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन संबंधित उमेदवारांना नियुक्ती देण्यात येते. सद्य:स्थितीत डिसेंबर, २०२४ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या नियुक्त्या प्रलंबित नाहीत.
(२) सदर महाविद्यालयात ५० % पेक्षा जास्त अध्यापक उपलब्ध असल्याने वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी पुरेसा अध्यापक वर्ग उपलब्ध आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दारिद्र्य रेषेखालील अपात्र ठरलेल्या कुटुंबियांना 'अपात्र पण गरजू' या योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१३) २७३८ (१७-०७-२०२५) श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण भागातील लोकांना रुपये ४४ हजार आणि शहरी भागासाठी रुपये ५९ हजार एवढी वार्षिक उत्पन्न मर्यादा घालण्यात आल्यामुळे महागाईचे प्रमाण वाढले असून या निकषामध्ये बदल करण्याची मागणी राज्यभरातून होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दारिद्र्य रेषेखालील अपात्र ठरविण्यात आलेल्या कुटुंबियांना शासकीय योजनांचा लाभ न मिळाल्यास शासनामार्फत 'अपात्र पण गरजू' कुटुंबांसाठी कोणत्या योजना राबविण्यात येणार आहेत काय,
(३) असल्यास, उक्त निकष हे सन २०११ च्या जणगणनेनुसार असल्याने राज्यभरातील अनेक शिधापत्रिका धारक या योजनेत बसत नसतानाही धान्य पुरवठा जुन्याच निकषानुसार चालू असल्याने खरे गरजू वंचित राहतात त्यामुळे या निकषात बदल करण्यासाठी या योजनेत बदल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी किमान ८ लाख रुपयांची उत्पन्न मर्यादा असल्याने हीच मर्यादा अन्नसुरक्षेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना शासन उपलब्ध करून देणार आहे काय, तसेच

विविध शासकीय योजना राबविताना सर्वच विभागासाठी शासन किमान उत्पन्न मर्यादेची अट समान ठेवणार आहे काय,
(५) असल्यास, दारिद्रेरेषेखालील उत्पन्न मर्यादा ग्रामीण भागासाठी किमान रुपये ३ लाख व शहरी भागासाठी रुपये ३.५ लाख एवढी करण्यासाठीच्या मर्यादेचे पुनर्विलोकन करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२५-०८-२०२५) :** (१), (२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना राबविण्यात येतात. शासन निर्णय दिनांक १७/०७/२०१३ व शासन शुध्दीपत्रक दिनांक १४/११/२०१३ नुसार अंत्योदय अन्न योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी केंद्र शासनाने वेळोवेळी राज्य शासनास केलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार पात्र लाभार्थ्यांचे निकष निश्चित केलेले आहेत. त्यामध्ये अंत्योदय योजनेसाठी प्राप्त लाभार्थ्यांची नावे दारिद्र्य रेषेखाली नसली तरीही त्यांना शिधापत्रिका देण्यात याव्यात व त्यांची नावे दारिद्र्य रेषेखालील यादित लाभार्थ्यांच्या इष्टांकाच्या मर्यादेत राहून समाविष्ट करावीत. सदर निकष हे सामाजिक असून, आर्थिक बाबींवर आधारीत नाहीत. तसेच प्राधान्य कुटुंब योजनेसाठी शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१३ अन्वये ग्रामीण भागातील लोकांना रुपये ४४ हजार आणि शहरी भागासाठी रुपये ५९ हजार एवढी वार्षिक उत्पन्न मर्यादा निश्चित केलेली आहे. सदर निकषांमध्ये बदल करून सुधारित निकष निश्चित करण्यासाठी दिनांक ११/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(४) हे खरे नाही.
(५) दारिद्र रेषेखालील व्यक्तींसाठी अंत्योदय अन्न योजना राबविण्यात येते. सदर योजनेचे निकष हे सामाजिक असून, आर्थिक बाबींवर आधारीत नाहीत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र व राज्य सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी व श्रावणबाळ निराधार योजनेच्या निधीचा अपहार केल्याबाबत

**(१४) २८८४ (१०-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, विधवा, परित्यक्त्या इत्यादी लाभार्थ्यांना सहाय्य देण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निराधार योजना या दोन्ही योजनांमध्ये पात्र नसलेल्या लाभार्थ्यांना लाभ देऊन शासनाच्या निधीचा अपहार केल्याचे प्रकार माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त दोन्ही योजनांतील लाभार्थ्यांची पात्रता पडताळून अपात्र लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या लाभाची रक्कम वसूल करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही योजनांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ (२०-०८-२०२५) :** (१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निराधार योजनेमध्ये अपहार झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे.
(२) जिवती (जि.चंद्रपूर) येथील प्रकरणी अपात्र लाभार्थ्यांकडून पैशांच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(३) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यामध्ये संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी उपविभागीय अधिकारी, राजूरा यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी पथक नेमले होते. सदर पथकाच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने, सदर प्रशासकीय तसेच वित्तीय अनियमिततेस जबाबदार असलेल्या संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणातील अशासकीय आरोपींवर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांनाही अटक करण्यात आली आहे. तसेच याप्रकरणी पोलीस यंत्रणेकडून तपास सुरु आहे.

सदर प्रकरणातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत चौकशी पथकाने शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयाकडून संबंधितांवर विभागीय चौकशी करुन शिस्तभंगाची कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संजय गांधी निराधार योजनेची उत्पन्न मर्यादा व वयोमर्यादा लाडकी बहीण योजनेप्रमाणे करण्याबाबत

**(१५) २९०५ (१०-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेसाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपर्यंत असावे अशी अट ठेवण्यात आलेली असताना संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत पात्रतेसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये १८,०००/- एवढी ठेवण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त दोन्ही योजनांमध्ये वार्षिक उत्पन्न मर्यादेत तसेच योजनेमधील पात्रतेसाठी निश्चित करण्यात आलेल्या वयोमर्यादांमध्येही तफावत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संजय गांधी निराधार योजनेची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा तसेच वयोमर्यादा वाढविण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ (२०-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही. संजय गांधी निराधार अनुदान योजनेचा लाभ मिळवण्यासाठी कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये २१,०००/- आहे.
(२), (३) व (४) मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहीत, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहीत महिलेला लाभ देण्यात येतो. सदर योजनेंतर्गत लाभार्थी महिलेच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेमध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा रुपये २१,०००/- पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असलेल्या १८ ते ६५ वयोमर्यादा असलेल्या पात्र लाभार्थ्यांना रुपये १५००/- दरमहा इतके अर्थसहाय्य दिले जात आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या दोन्ही स्वतंत्र योजना असल्याने संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या निकषात बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र व राज्यांमधील कर उत्पादनाची विभागणी ४१ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्याबाबत

**(१६) २९९८ (१७-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्यांमधील कर उत्पादनाची विभागणी ४१ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढवावी, अधिभार (सेस) व उपकर (सरचार्जेस) हे मुख्य करांमध्ये समाविष्ट करावेत, केंद्र शासनाच्या करेतर उत्पन्नाचाही समावेश विभागणीच्या निधीत करावा अशा महत्त्वपूर्ण मागण्या १६ व्या वित्त आयोगाच्या बैठकीत राज्य शासनाने केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२२-०८-२०२५) :** (१)१६व्या केंद्रीय वित्त आयोगाने दिनांक ८ व ९ मे, २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचा दौरा केला असून, सदर दौऱ्याच्यावेळी राज्य शासनामार्फत १६व्या केंद्रीय वित्त आयोगास त्यांच्या TOR शी निगडित निवेदन सादर करण्यात आले आहे. या अनुषंगाने १६व्या केंद्रीय वित्त आयोगाने त्यांचा अहवाल केंद्र शासनास दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत सादर करणे अपेक्षित आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उच्च माध्यमिक शाळेतील वाढीव पदांना अनुदान देण्याबाबत

**(१७) ३३१४ (०२-०६-२०२०) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक शाळेतील व्यपगत पदे व सन २०१९ पर्यंतच्या वाढीव पदांना अनुदान देण्यासाठी उच्चस्तरीय सचिवांच्या समितीऐवजी मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करून अनुदान देण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी निर्देश दिल्यानंतर कोणती कार्यवाही करण्यात आली,

(२) असल्यास, सदर वाढीव पदांच्या नस्तीमध्ये विधी व न्याय विभागाने त्रुटी काढल्याने या त्रुटी पूर्ण करण्यासाठी संचालक शिक्षण यांच्याकडे ६ महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या नस्तीबाबत कोणता निर्णय घेण्यात आला, तसेच घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळेतील वाढीव पदांना अनुदान देणेबाबत

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून प्राप्त झालेली माहिती तपासून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१), (२) व (३) राज्यातील उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००३-०४ ते सन २०१८-१९ या कालावधीतील वाढीव पदांवरील विहीत कार्यपध्दतीनुसार नियुक्त झालेले व कार्यरत असलेल्या एकूण २८३ पात्र शिक्षकांचे समायोजन करण्यास शासन निर्णय दिनांक ०९/११/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानंतर, शासन निर्णय दिनांक ०७/०३/२०२४ अन्वये अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या एकूण २४९ पात्र शिक्षकांचे समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांत इमुनोलोजी आणि रुमेटोलोजी या विषयातील डॉक्टरेट ऑफ मेडिसिन अभ्यासक्रमाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**(१८) ३३४८ (१०-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामान्य रुग्णांमध्ये संधिवात व ऑटोइम्यून रोग आणि इतर संबंधित आजारांचे प्रमाण वाढत असून आधुनिक वैद्यकीय संशोधन आणि उपचाराच्या दृष्टीने इमुनोलोजी आणि रुमेटोलोजी हे विषय महत्वाचे बनत असून या क्षेत्रात तज्ञ डॉक्टरांची कमतरता असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय यांनी इमुनोलोजी आणि रुमेटोलोजी या विषयात डी.एम. (डॉक्टरेट ऑफ मेडिसिन) अभ्यासक्रम सुरु करणेबाबत प्रस्ताव शासनस्तरावर सादर केला असून सदर प्रस्तावास मान्यता देणेबाबत लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभ्यासक्रम सुरु करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१८-०८-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये इमुनोलोजी आणि रुमेटोलोजी या विषयात डी. एम. (डॉक्टरेट ऑफ मेडिसिन) अभ्यासक्रम सुरु नाही.
तथापि, इमुनोलोजी आणि क्लिनीकल रुमेटोलोजी विभागाशी संबंधित आजारग्रस्त रुग्णांची उपचाराआभावी गैरसोय होऊ नये याकरीता आठवड्यातून दोन दिवस शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे बाह्यरुग्ण विभाग सुरु असून, सदर विभागात ८० ते १०० रुग्णांची नियमितपणे तपासणी केली जाते.
(२) हे खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे इमुनोलोजी आणि रुमेटोलोजी विषयात डीएम अभ्यासक्रम सुरु करणेबाबत श्री.कृपाल तुमाने, विधानपरिषद सदस्य यांनी दिनांक ०३/०५/२०२५ रोजी मा.मंत्री (वै.शि.) यांना निवेदन दिलेले आहे.

तथापि, सदर निवेदनात नमूद केल्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर यांचेकडून याविषयक प्रस्ताव संचालनालय अथवा शासन स्तरावर सादर करण्यात आलेला नाही.

(३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये इमुनोलोजी आणि रुमेटोलोजी या विषयात डी.एम. (डॉक्टरेट ऑफ मेडीसीन) अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकडून संचालनालयास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावाची छानननी शासनामार्फत आवश्यकता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल व सदर आवश्यकता प्रमाणपत्राच्या आधारे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचेकडून परवानगी मिळाल्यानंतर अभ्यासक्रम सुरु करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील शिक्षकांचे शैक्षणिक निकष पूर्ण नसल्याबाबत

**(१९) ३७५५ (१०-०७-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय खोडके, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आयुर्विज्ञान विद्यापिठाने राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या केलेल्या तपासणीमध्ये एकही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेचे (एनएमसी) आवश्यक असलेले शिक्षक वर्गाचे निकष पूर्ण करीत नसल्याचे आणि मंजूर शिक्षक क्षमतेच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी शिक्षक असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला असून राज्यात अशी किती शासकीय महाविद्यालये आहेत ज्यांनी राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेचे निकष पूर्ण केले नाही याचा तपशिल सादर केला आहे काय तसेच त्यापैकी किती विद्यालयात नियमाप्रमाणे शिक्षक कार्यरत आहेत,

(३) असल्यास, उक्त महाविद्यालयांनी हे निकष पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग नवी दिल्ली यांच्याकडून मे, २०२५ मध्ये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. नोटीसीच्या अनुषंगाने खुलासा सादर करण्यात आलेला असून तद्नंतर राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक १३/०६/२०२५ च्या पत्रान्वये २८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील त्रुटी संदर्भात सुनावणी आयोजित

करण्यात आली होती. सदर सुनावणीमध्ये शिक्षकांची रिक्त पदे दैनंदिन बायोमेट्रिक हजेरी, प्रयोगशाळा चाचण्या इत्यादीं सूचनांचा समावेश आहे.
सद्य:स्थितीत या २८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मंजूर पदांच्या ५० टक्के ते ७० टक्के पर्यंत अध्यापकीय पदे भरलेली आहेत.
(३) राज्यातील २५ जुन्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ५० टक्क्यांपेक्षा जास्त शिक्षक वर्ग उपलब्ध आहेत. नवनिर्मित १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील बहुतांश रिक्त पदे द्वितीय वर्षातील असून सदर महाविद्यालयात द्वितीय वर्ष सप्टेंबर, २०२५ पासून सुरु होत असल्याने तत्पूर्वी रिक्त पदे प्राधान्याने भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आतकोली वाशेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) गावालगच्या खादाणीच्या दिशेकडील शासकीय जागेवर ठाणे महानगरपालिकेकडून मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात येत असल्याबाबत

**(२०) ४१११ (१८-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आतकोली वाशेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) गावालगच्या खादाणीच्या दिशेकडील शासकीय जागेवर ठाणे महानगरपालिकेकडून मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात येत असल्याने आतकोली गावात मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेला डम्पिंग ग्राउंडसाठी परवानगी दिल्याने आतकोली वाशेर व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना भविष्यात कचऱ्याची दुर्गंधी, आग लागणे, श्वसन विकार अशा आजारांना सामोरे जावे लागणार अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डम्पिंग ग्राउंडमुळे परिसरात दुर्गंधी व प्रदूषणात वाढ होऊन दूषित पाण्यामुळे जमिनीची सुपीकता नष्ट होऊन शेतकऱ्यांच्या शेतीवर परिणाम होणार असून परिसरातील विहीरी, बोअरवेल व गाव तळ्यातील पाणी दूषित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आतकोलीतील आदिवासींचे गाव समृद्धी महामार्गावर येत असतानाच या गावांना प्रदूषणाने वेढले असल्याने या गावाची प्रदूषणापासून मुक्तता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०८-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सदर जागेवर डंपिग ग्राऊंड सुरू करण्यात येत नसून, घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन करण्यात येणार आहे.

(४) सदर जागेच्या हवेच्या गुणवत्तेचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परिक्षण करण्यात आले असून, सदर ठिकाणच्या हवेमधील घटक योग्य प्रमाणात असल्याबाबतचा अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.